# नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

## निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील मानधनावर शिक्षक भरती.

जाहिरात क्र. १ /२०१६ जा.क्र. नमुंमपा/शिक्षण विभाग /२९६६/२०१६

दिनांक: २६/१२/२०१६

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील प्राथमिक शाळांमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ४ महिन्याकरीता मानधनावर खालीलप्रमाणे माध्यमनिहाय व प्रवर्गनिहाय शिक्षक भरती करावयाची आहे.

| संवर्ग | माध्यम | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | उर्दु |
| अनु. जाती (SC) | २४ | १५ | २ |
| अनु.जमाती (ST) | ० | ९ | १ |
| विजा-अ (NT-A) | ६ | ४ | १ |
| भज-ब (NT-B) | ३ | २ | ० |
| भज-क (NT-C) | ४ | ४ | १ |
| भज-ड (NT-D) | ० | २ | ० |
| एस.बी.सी. (SBC) | ० | २ | ० |
| इमाव (OBC) | ११ | २१ | १ |
| खुला (OPEN) | ३२ | १४ | २ |
| **एकूण (Total)** | **८०** | **७३** | **८** |

१. **अर्हता :** एच.एस.सी.-डी.एड/ बी.ए.-बी.एड्./बी.एस्सी.-बीएड्.

२. **मानधन :** दरमहा रू. १२,०००/- रूपये.

३. **वयोमर्यादा :** खुला-३८ वर्षे पर्यंत मागासवर्गीयासाठी-४३ वर्षे पर्यंत.

४. **निवडीसाठी कार्यपद्धती :** अध्यापन पदविकेच्या (डी. एड./बी.एड्.) परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे एकत्रित गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. कागदपत्रे छाननीच्या वेळी मूळ गुणपत्रिका व मुळ प्रमाणपत्रे तपासण्यात येतील. छाननीच्या वेळी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. छाननीनंतर निकाल www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

५. **अर्ज कसा करावा :** अ) अर्ज www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरण्यात यावा. ब) प्रत्यक्ष कागदपत्रे छाननीच्या वेळी मूळ शैक्षणिक व व्यवसायिक प्रमाणपत्रे तसेच त्याची एक सांक्षाकित प्रत स्वत:च्या रंगीत छायाचित्रासह सादर करावी. प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पाठविलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

६. **अर्ज करावयाची अंतिम दिनांक :- ०२/०१/२०१७** पर्यंत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २८/०७/२००४ च्या निर्णयास अनुसरून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांचा नवी मुंबई महानगरपालिकेवर कायम स्वरूपी नोकरीबाबत कोणताही हक्क राहणार नाही.**

सही/-

**(तुकाराम मुंढे)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**